# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०३/२०२४ (शुक्रवार) सकाळ**


---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई
## वाहनासह एकुण ३०,१२,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक २८/०३/२०२४ रोजी यातील मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान नागपूर ग्रामीण पोस्टे मौदा परिसरात स्टाफसह गस्त व अवैध धंदे रेडकामी गस्त करित असताना बोरगाव शिवारात भंडारा ते नागपूर रोडवर भंडाराकडून येणारे ट्रक क्र. एम. एच— ४०/सी. व्ही ७७५० येतांना दिसला. सदर ट्रक थांबवून ट्रकची पाहणी केली असता ट्रक क्र. एम. एच—४०/सी. व्ही ७७५० मध्ये **आरोपी नामे— १) निकेश गंगाधर वाडीभस्मे रा. बासुरा पोस्ट दवळीपार २) शैलेश प्रदीप सपाटे रा. अर्जुनी पोस्ट मानेगाव** हे विनापरवाना रेती वाहतूक करित असल्याचे समजले. ट्रक चालकास ट्रकचे कागदपत्र व रेती वाहतुकीचा परवाना (रॉयल्टी) विचारले असता त्याने ट्रकचे कागदपत्र व रेती वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याचे सांगीतले. तसेच ट्रक मालक **नयन कवळू तुमसरे, रा. मारोडी कॉलनी, मौदा** याचे सांगणे वरुन ट्रक मध्ये रेती भरुन घेउन जात असल्याचे सांगीतले. आरोपींच्या ताब्यातून एकूण ०६ ब्रास रेती एकूण किमती १२,०००/— रूपयाचा मुद्देमाल तसेच ट्रक किंमती ३०,००,०००/— रूपये असा एकूण ३०,१२,०००/— किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोहवा मुकेश दिगांबर रामेलवार, नेमणूक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय कन्हान यांचे रीपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे आरोपी यांचेविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भादंवि. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान श्री. संतोष गायकवाड यांचे सोबत पोहवा मुकेश रामेलवार, चालक मुकेश यादव यांनी पार पाडली.

# जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक

**पोस्टे कन्हान:–** अंतर्गत मौजा जय दुर्गा हॉलचा मागे आरोपीचे घरासमोर कांद्री कन्हान ता. पारशिवनी येथे दिनांक २८/०३/२०२४ चे ०९.०० वा. ते ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अंकुश शांतालाल केसरवाणी, वय ४० वर्ष, रा. नुतन सरस्वती स्कुल के सामने वार्ड ०४ कांद्री ता. पारशिवनी याने **आरोपी नामे– सुनिल मधुसुधन तिवारी, वय ३५ वर्ष, रा. जय दुर्गा हॉल चा मागे कन्हान तह. पारशिवनी** याला उधार दिलेले पैसे मागण्यासाठी आरोपीच्या घरी गेले असता त्याचा राग मनात धरून आरोपीने त्याचा जवळील गनने फिर्यादीला जिवे मारण्याच्या उद्देशाने गोळी झाडली आरोपीची आई मधात आली असल्याने तिचा छातीला व डाव्या हाताला गोळी लागुन जखमी झाली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे आरोपीविरूद्ध कलम ३०७ भादंवि. सहकलम ३,२५ भाहका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास कन्हान पोलीस करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर